ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT.
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख ९ एप्रिल, १९५८ | अंक १५

## विविध माहिती

**हिंवतापाविरुद्ध मोहीम**— उत्तरप्रदेशांत हिंवतापावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न आतांपर्यंत करण्यांत आले. ता. १ मे पासून राज्यांतील हिंवतापाचें समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीनें मोहीम चालू करण्यांत येणार आहे. दरसाल लक्षावधि लोकांना ह्या रोगाची बाधा होते. जरूर तितक्या लोकांना वैद्यकीय शिक्षण देऊन तयार करण्यांत येत आहे.

**तेलाच्या आयातींत कपात**—प्रेसिडेंट आयसेनहोअर ह्यांनीं अमेरिका करीत असलेल्या तेलाच्या आयातींत कपात करण्याचा हुकूम काढला आहे. ह्या हुकमामुळें कॅनडा, व्हेनेझुएला आणि मध्यपूर्वेतील देश ह्यांच्याकडून होणारी आयात दररोज सुमारें ५८,००० पिपांनीं कमी होईल.

**कॅनडाकडून भारताला मदत**—कोलंबो योजनेंत समाविष्ट असणाऱ्या देशांना गहूं पुरविण्याचें कॅनडानें ठरविलें आहे. कॅनडाकडून १·५ कोटी डॉलर्स किंमतीचा गहूं पुरविण्यांत येईल. सुमारें ८० लाख डॉलर्स किंमतीचा गहूं भारताला व २० लाख डॉलर्स किंमतीचा गहूं पाकिस्तानला पुरविण्यांत येणार असल्याची घोषणा झाली आहे.

**मद्रास कॉर्पोरेशनला कर्ज**—मद्रास कॉर्पोरेशनला पदपथावर राहणाऱ्या लोकांसाठी घरें बांधतां यावीं म्हणून राज्यसरकारनें ३१,००० रुपयांचा दुसरा व शेवटचा हप्ता मंजूर केला आहे. ह्या कामासाठी मंजूर करण्यांत आलेला २५,२०० रुपयांचा हप्ता ऑक्टोबरमध्यें देण्यांत आला आहे.

**प्रवाशांच्या सुखसोयींवर खर्च**—१९५८ च्या एप्रिल पासून सुरू झालेल्या आर्थिक वर्षांत प्रवाशांच्या सुखसोयींवर ३ कोटी रुपये खर्च करण्याचें रेल्वेखात्यानें ठरविलें आहे. सगळ्यांत अधिक रक्कम दक्षिण रेल्वेला मंजूर करण्यांत आली आहे. त्या खालोखाल मध्य व पश्चिम रेल्वेजना रक्कमा मंजूर करण्यांत आल्या आहेत.

**चांगल्या चित्रपटांवर कमी कर**—पश्चिम जर्मनींतील ११ उपराज्यांनीं चांगल्या चित्रपटावर कमी करमणूक कर आकारण्याचें ठरविलें आहे. विशेषतः सांस्कृतिक दृष्ट्या उच्च पातळीच्या चित्रपटांना ही सवलत देण्यांत येणार आहे.

**बिहारमधील शालेय वर्ष**—बिहार राज्य सरकारनें राज्यांतील शाळांच्या वर्षांत बदल करण्याचें ठरविलें आहे. १९५९ पासून शाळांचें वर्ष जानेवारीपासून सुरू करण्यांत येईल. आतांपर्यंत शाळांचें वर्ष जुलैमध्यें सुरू होत असे. ह्या बदलाच्या सोयीसाठी १ ते १० इयत्तांच्या परीक्षा एप्रिलमध्यें घेण्यांत येणार आहेत.

**तांदुळाच्या उत्पादनांत पहिला अनुक्रम**—१९५६ मध्यें चीननें तांदुळाच्या उत्पादनांत जगांत पहिला अनुक्रम पटकावला. चीनमध्यें सुमारें ८,२४,८०,००० मेट्रिक टन तांदुळाचें उत्पादन झालें. त्याचवर्षी रशिआनें शास्त्रीय विषयांवरील पुस्तकें अमेरिकेपेक्षा बरींच अधिक प्रसिद्ध केलीं.

**सायकलवरील कर रद्द**—इंदूरच्या नगरपालिकेच्या निवडणुकींत विजयी झालेल्या नागरिक समितीनें सायकलींवरील कर रद्द केला आहे. समितीनें आपल्या निवडणूक जाहीरनाम्यांत तसें आश्वासन दिलें होतें. इंदूर शहरांत सुमारें २९,००० सायकली असून त्यांच्यावरील करामुळें ५०,००० रुपयांचें उत्पन्न मिळत होतें.

**दिल्लीसाठी ड्रेनेजची योजना**—दिल्ली शहरासाठी ड्रेनेजची व पुरापासून संरक्षण करण्याची एक योजना तयार करण्यांत आली असून ती भारत सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत आली आहे. ह्या दोन्ही कामासाठी ३७ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. त्यापैकी ७ लाख रुपये पुरापासून संरक्षण करण्यासाठीं खर्च होतील.

**हस्तव्यवसायाचें दुकान**—केरळ राज्यांतील हस्तव्यवसायांत तयार करण्यांत आलेल्या वस्तूंची विक्री करण्यासाठी दिल्लीला एक दुकान काढण्याचें केरळ सरकारनें ठरविलें आहे. केरळ राज्यांत हस्तिदंत शिंगें, लाकूड, गवत इत्यादि, वस्तूंपासून अनेक प्रकारच्या आकर्षक वस्तू बनविण्यांत येतात.

**अणुस्फोटाची गुप्त चांचणी अशक्य**—रशिआनें अणु व हैड्रोजन बॉम्बची चांचणी बंद केली असली तरी अशी चांचणी गुप्त रीतीनें करतां येईल असा आक्षेप अमेरिकेनें घेतला होता. रशिआतर्फे आक्षेपाला देण्यांत आलेल्या उत्तरांत अशी चांचणी गुप्ततेनें करणें शक्य असल्याचें म्हटलें आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## दि बेळगांव बँक लि., बेळगांव

दि बेळगांव बँक लि.ला गेल्या वर्षी १,२२,३२० रु. निव्वळ नफा झाला व भागीदारांना ५% + २½% बोनस, असें ७½% डिव्हिडंड देण्यांत आले. १९५६ च्या डिव्हिडंडचा दर ५% + १¼% = ६¼% असा होता. बँकेला गेलें वर्ष समाधानकारक गेलें. पैशाच्या गुंतवणुकीस भरपूर वाव मिळाल्यामुळें उत्पन्न चांगलें वाढलें. बँकेनें ठेवींवरील व्याजाच्या स्पर्धेत भाग न घेण्याचें धोरण ठेवलें; त्यामुळें ठेवींत विशेष वाढ झाली नाहीं. सर्व शाखांचा व्यवहार वाढत आहे. बँकेनें १९५६ सालीं ठेवींवर २,४५,६८१ रु. व्याज दिलें होतें आणि व्याज-डिस्कौंटच्या रूपानें ४,७६,२२१ रु. मिळविले होते. १९५७ चे तत्सम आकडे अनुक्रमें २,७२,७४६ रु. व ५,३६,१९१ रु. आहेत. बँकेनें सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय गोकाक गांवांतील शाखेंत सुरू केली आहे आणि निपाणी व चिकोडी शाखांतूनहि तीं सुरू करण्याचा विचार आहे. मुख्य कचेरींतील लॉकर्सची लोकप्रियता वाढत आहे. बँकेचे डायरेक्टर व १९५८ सालाचे चेअरमन, श्री. गो. वि. सराफ, यांनीं बँकेच्या वार्षिक सभेतील आपल्या भाषणांत बेळगांव बँकेच्या कार्याचा व बँकिंगविषयक परिस्थितीचा उत्कृष्ट आढावा घेतला, तो "अर्थ" च्या गेल्या अंकांत प्रसिद्ध झालाच आहे. बँकेची मजबुती तिच्या ताळेबंदाच्या बेरजेवर अवलंबून नसून ती बँकेच्या नफा मिळविण्याच्या पात्रतेवर व एकूण देण्यांशीं स्वतःच्या भांडवलाचें प्रमाण ( भाग भांडवल + रिझर्व्हज ) पुरेसें राखण्यावर अवलंबून असतें. ह्या दृष्टीनेंहि बेळगांव बँकेची प्रगति संचालकांना अभिमानास्पद वाटेल, अशी आहे. बँकेनें मुख्य कचेरीचें ऑडिट आणि शाखांचें ऑडिट वेगवेगळ्या ऑडिटरांकडून करवून घेतलें आहे.

### बेळगांव बँकेची प्रगति

| | १९५२ | १९५४ | १९५६ | १९५७ |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ६,००,००० | ६,००,००० | ६,००,००० | ६,००,००० |
| रिझर्व्हज | १,७६,२०७ | २,१९,१२६ | २,६३,८९० | २,९०,२०१ |
| ठेवी | ७५,०७,६११ | ९५,४५,७७२ | १,११,४०,१२५ | १,१५,६१,४६७ |
| कर्जें | ३७,१२,३६२ | ३९,१३,३७१ | ५३,४८,२८४ | ५७,८५,०६३ |
| खेळतें भांडवल | ९२,९३,५०७ | १,१७,०५,१०१ | १,४१,७६,१०६ | १,४६,०५,०३० |
| नफा | ६५,५८५ | ८३,३६८ | ७९,००६ | १,२०,७५९ |
| डिव्हिडंड | ६¼% | ५% + १¼% | ५%+१¼% | ५% + २½% |

### मध्यवर्ती सरकारच्या सचिवालयांतील अधिकाऱ्यांची भरती

सेंट्रल सेक्रेटरिएट सर्व्हिसमधील असिस्टंटांच्या ४०० जागा युनिअन पब्लिक सर्व्हिस कमिशननें जुलै, १९५७ मध्यें घेतलेल्या परीक्षेच्या निकालांवरून भरण्यांत येतील. यांपैकी ५० जागा अनुसूचित जातींच्या उमेदवारांसाठी व ५४ जागा अनुसूचित जनजातींच्या उमेदवारांकरितां राखून ठेवण्यांत आल्या आहेत. त्याशिवाय इंडियन फॉरिन सर्व्हिसमधील ( ब्रँच 'बी' ) ग्रेड ४ ( असिस्टंटस ) च्या २५ जागा व रेल्वे बोर्ड सेक्रेटरिएट सर्व्हिसमधील ग्रेड ४ ( असिस्टंटस ) च्या ७ जागा उपरोक्त परीक्षेच्या निकालानुसार भरण्यांत येतील. या दोन सर्व्हिसेसमध्यें अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजातींच्या उमेदवारांसाठी अनुक्रमें ३ व १ जागा राखून ठेवण्यांत आली आहे. उपरोक्त परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या सुमारें २,००० उमेदवारांचीं नांवें युनिअन पब्लिक सर्व्हिस कमिशननें नुकतींच जाहीर केलीं आहेत.


स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( अध्यक्ष )
श्री. गे. गो. ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. म. बा. बेंडे, ( ऑ. खजिनदार )
श्री. म. मा. वामन डायरेक्टर
श्री. गे. ल. पाटील नलवडे ,,
श्री. आ. पां. ढोरे ,,
श्री. ज्ञा. मा. मनसुख ,,
श्री. म. रा. नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.



स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा
[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.
शाखा-मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-८-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

# अर्थ

बुधवार, ता. ९ एप्रिल, १९५८



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


### विद्यापीठांतील विद्यार्थ्यांच्या संख्येवर मर्यादा

विद्यापीठ अनुदानमंडळाचे अध्यक्ष श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं विद्यापीठांत शिक्षणासाठीं येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर मर्यादा घालण्याची सूचना केली आहे. लखनौ विद्यापीठांतील विद्यार्थ्यांसमोर बोलतांना ते म्हणाले कीं, विद्यापीठांतील शिक्षणानें ज्या विद्यार्थ्यांचें हित होण्याचा संभव आहे अशाच विद्यार्थ्यांना ह्या शिक्षणाची संधि दिली गेली तर तें अधिक बरें होईल. प्रत्येकाला विद्यापीठांत प्रवेश करण्याची परवानगी दिल्यानें बेकारांच्या संख्येंत मात्र भर पडेल. शिक्षणाच्या दर्जांत जी घसरगुंडी झाली आहे तिचेंहि कारण विद्यार्थ्यांची अफाट संख्या हेंच आहे. विद्यार्थ्यांची संख्या फार असल्यामुळें शिक्षण-संस्थांतून असणाऱ्या वाचनालयांचा, प्रयोगशाळांचा अगर इतर सवलतींचा फायदा त्यांना घेतां येत नाहीं. विद्यापीठांतर्गत शिक्षणावर मर्यादा घातल्या, तर असें शिक्षण घेऊन बाहेर पडणारे विद्यार्थी अधिक कार्यक्षम होतील व त्यांना नोकऱ्याहि कमी त्रासानें मिळूं शकतील. देशांतील सुशिक्षित नोकरांची पहाणी केली असतां असें दिसून आलें कीं, सुमारें १,२५,००० पदवीधर बेकार आहेत. त्यापैकीं २५,००० पदवीधरांनीं आपलीं नांवें उद्योग-विनिमय-केंद्रांतून नोंदविलेलीं आहेत. बेकार पदवीधरांपैकीं ७५ टक्के पदवीधर आर्ट्स अगर कॉमर्सचे पदवीधर आहेत. पदवीधरांची बेकारी कमी-अधिक प्रमाणांत सर्वच राज्यांतून असली तरी पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि दिल्ली ह्या राज्यांतून अधिक बेकार पदवीधर आढळून येतात. प्रत्येक विद्यापीठांत विद्यार्थी-हित-संवर्धन फंड काढण्याचा विचार होत आहे.

---

### एंजिनिअरिंग कारखान्यांना कच्च्या मालाचा तुटवडा

इंडिअन एंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष मि. क्रीटस ह्यांनीं संस्थेच्या वार्षिक सभेच्या प्रसंगीं बोलतांना अशी भीति व्यक्त केली आहे कीं, एंजिनिअरिंगच्या बऱ्याच कारखान्यांना कच्च्या मालाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें कारखाने संपूर्णपणें अगर अंशतः बंद ठेवावे लागण्याचा संभव आहे. ते म्हणाले कीं कच्च्या मालाच्या, विशेषतः पोलादाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें बऱ्याच कारखान्यांची चिंताजनक परिस्थिति झाली आहे. १९५७ सालीं ह्या कारखान्यांनीं एकंदरीनें चांगली प्रगति केली हें खरें. पण, ह्या प्रगतींतच कांहीं मर्मस्थळें दडलेलीं आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्यास उत्पादनांत अडथळे उत्पन्न होतील आणि बेकारी वाढेल. १९५७ सालच्या दुसऱ्या सहामाहीकडे नजर टाकली, तर असें दिसून येतें कीं ह्या अवधींत इलेक्ट्रिक मोटार्स, मोटारी, सायकली, इत्यादींच्या उत्पादनांत घट झालेली आहे. गेल्या ऑक्टोबर महिन्यापासून लोखंड, पोलाद व एंजिनिअरिंगच्या कारखान्यांना बँकांकडून मिळणाऱ्या कर्जांतहि घट झालेली ह्याहे. ह्यावरूनहि उत्पादनांत घट झाल्याचेंच निष्पन्न होतें. कलकत्त्यामधील रोजगारीची परिस्थिति हळुहळू बिघडत चाललेली आहे. कच्च्या मालांच्या दुर्मिळतेप्रमाणेंच चढत्या किंमतींना ग्राहकांचा होत असलेला विरोधहि उत्पादन घटण्याचें आणखी एक कारण आहे. भारतामधील उत्पादनाच्या किंमती वाढत चाललेल्या आहेत. पण तरीसुद्धां भारतामधील एंजिनिअरिंगच्या कारखान्यांनीं १९५२ च्या मानानें आपलें उत्पादन दुप्पट केलें आहे.

---

### राजस्थानमधील कालव्याची योजना

भारताचे गृहमंत्री श्री. गोविंद वल्लभ पंत ह्यांच्या हस्तें राजस्थानमध्यें एका मोठ्या कालव्याच्या कामाला प्रारंभ करण्यांत आला आहे. हा कालवा ४२५ मैल लांबीचा होणार असून त्याला होणारा पाण्याचा पुरवठा सतलज व बिआस ह्या पंजाबमधील नद्यांपासून होणार आहे. राजस्थान हें राज्य बऱ्याच प्रमाणांत नापीक आहे. पण ह्या नापीकपणाला पाण्याचा अभाव हेंच कारण मुख्य आहे. कालव्यामुळें पाण्याचा पुरवठा निश्चित झाल्यास राजस्थानच्या उत्तरेकडील व वायव्येकडील भागांत चांगलीं पिकें काढतां येणें शक्य होणार आहे. भारतामधील नैसर्गिक दृष्ट्या सुपीक असलेल्या इतर राज्यांबरोबर राजस्थान येईल असें मात्र नाहीं. कालवा पूर्ण झाल्यावर तो बहुधा जगांतील सर्वांत लांब कालवा होईल. सतलज नदीपासून काढण्यांत येणारा हा कालवा ११० मैलपर्यंत पंजाबमधून वाहणार आहे. त्यानंतर तो राजस्थानच्या हद्दींतून जाईल. कालव्याचें काम दोन हप्त्यांनीं पुरें करण्यांत येणार आहे. पहिला टप्पा पूर्ण झाल्यावर सुमारें १० लाख एकर जमिनीला कायमचा पाणीपुरवठा होऊं लागेल. दुसरा टप्पा पूर्ण करण्यासाठीं प्रथम रावी आणि बियास ह्या नद्यांवर पाणी सांठविण्याची व्यवस्था करावी लागेल. पावसाळ्यांत ह्या नद्यांना जें पाणी येतें त्यापैकीं कांहीं सांठवून ठेवण्यासाठीं बांधकाम करावें लागेल. दुसरा टप्पा पूर्ण झाल्यावर आणखी ३० लाख एकर जमीन भिजण्याची सोय होईल. ह्याच कालव्याच्या पाण्याचा उपयोग करून राजस्थानमधील वाळवंटाचा विस्तारहि थांबवितां येईल.

---

**रेल्वेच्या कोळशाच्या खपांत वाढ**—भारतामधील रेल्वेवर दररोज १० लाख मण कोळसा खपतो. १९५६-५७ सालीं रेल्वेनें १·२१ कोटी टन कोळसा जाळला. त्यामागील वर्षाच्या मानानें कोळशाच्या खपांत ७·४ टक्क्यांनीं वाढ झाली आहे. मालाच्या वाहतुकींत वाढ झाल्यामुळें जळण अधिक लागत आहे असा तर्क आहे.

**पुस्तकांच्या आयातीला परवाना नको**—व्यक्ति अगर संस्था ह्यांना देणगी म्हणून परदेशांतून पुस्तकें यावयाचीं असल्यास त्यासाठीं परवान्याची जरूर लागणार नाहीं असें जाहीर करण्यांत आलें आहे. परंतु अशा देणगीदाखल आयात करण्यांत येणाऱ्या पुस्तकांची किंमत २५० रुपयांपेक्षा अधिक असतां कामा नये.

## स्वित्झरलंडच्या कारखानदारांचा नकार ?

भारतांत घड्याळें तयार करण्याचा धंदा उभारण्याच्या कामीं भारतानें स्वित्झरलंडमधील कारखानदारांची मदत मागितली होती. पण अशी मदत देण्यास त्यांनीं नकार दिला असल्याची वार्ता आहे. घड्याळें तयार करण्याचा धंदा त्या देशांत धातू-विषयक व यंत्रविषयक धंद्याच्या खालोखाल अत्यंत महत्त्वाचा धंदा आहे. ह्या धंद्यांत सुमारें ५५,००० माणसें गुंतलेलीं आहेत. परदेशी हुंडणावळीच्या प्राप्तीच्या दृष्टीनेंहि त्याचें महत्त्व आहे. १९५५ सालीं स्वित्झरलंडनें लहानमोठीं घड्याळें परदेशीं निर्यात करून १०७·६ कोटी फ्रँक किंमतीचें परदेशी चलन मिळविलें. इतका राष्ट्रीय महत्त्वाचा धंदा हातचा गमावण्यास तो देश तयार नाहीं. ह्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. इतर देशांना आपल्या खास धंद्याचीं रहस्यें शिकविल्यास आपला धंदा बसेल अशी भीति स्विस कारखानदारांना वाटणें साहजिक आहे. कारण, ह्या धंद्यांत त्यांनीं खरोखरीच अद्वितीय स्थान मिळविलेलें आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशालाहि स्वतःचा घड्याळाचा धंदा उभा करण्यासाठी स्विस बनावटीच्या घड्याळांच्या आयातीवर जबर कर बसवावा लागला. ह्या धंद्याची स्वित्झरलंडमधील पूर्व-पीठिका १६ व्या शतकापर्यंत मागें जाते. त्यामुळें ह्या धंद्याच्या कसबांत मुरलेला असा एक कामगारांचा वर्गच तेथें उत्पन्न झालेला आहे. हें कसब त्यांच्यांत पिढ्यानुपिढ्या चालत आलेलें आहे. त्यामुळें अतिशय गुंतागुंतीचीं घड्याळें ते तयार करूं शकतात. भारतांत दरसाल सुमारें ३ कोटी रुपये किंमतीचीं घड्याळें आयात करण्यांत येत असतात.

---

## घाऊक किंमतींचा इंडेक्स नंबर

| | अन्न | औद्योगिक कच्चा माल | अर्ध-पक्का माल | पक्का माल | इतर | सर्व प्रकारचा माल |
|---|---|---|---|---|---|---|
| | ऑगस्ट १९३९ अखेरचें वर्ष = १०० | | | | | |
| सरासरी | | | | | | |
| १९५१ | ४१० | ६०८ | ३७८ | ३९६ | ७३० | ४३९·३ |
| १९५२ | ३६० | ४५४ | ३४७ | ३७८ | ६३६ | ३८६·९ |
| १९५३ | ३८१ | ४६० | ३५६ | ३६७ | ६६२ | ३९३·९ |
| १९५४ | ३५९ | ४४८ | ३५६ | ३७६ | ६४८ | ३८६·८ |
| १९५५ | ३०५ | ४१२ | ३३४ | ३७३ | ५५५ | ३५५·४ |
| १९५६ | ३७३ | ४८८ | ३९० | ३८२ | ५४५ | ४०३·२ |
| १९५७ | ४१७ | ५२८ | ४०८ | ३९० | ६१३ | ४३१·२ |
| १९५७ जाने. | ३९२ | ५२५ | ४१२ | ३८७ | ५९३ | ४२२·१ |
| फेब्रु. | ४०६ | ५२१ | ४११ | ३८६ | ५८५ | ४२५·० |
| मार्च | ४०३ | ५१८ | ४०३ | ३८४ | ५७० | ४२१.२ |
| एप्रिल | ४०८ | ५१५ | ४०० | ३८४ | ५६७ | ४२२-१ |
| मे | ४१९ | ५३६ | ४०७ | ३८८ | ५७२ | ४३१·१ |
| जून | ४३३ | ५४१ | ४१३ | ३९२ | ५७५ | ४३९·२ |
| जुलै | ४४० | ५४४ | ४१३ | ३९२ | ६३७ | ४४३·५ |
| ऑगस्ट | ४४१ | ५३१ | ४११ | ३९३ | ६४३ | ४४१·८ |
| सप्टें. | ४२४ | ५२५ | ४०९ | ३९५ | ६४४ | ४३५·९ |
| ऑक्टो. | ४१२ | ५३४ | ४०६ | ३९५ | ६४६ | ४३२·८ |
| नोव्हें. | ४२० | ५३५ | ४०७ | ३९१ | ६६१ | ४३४·७ |
| डिसें. | ४०६ | ५०८ | ४०० | ३८९ | ६७७ | ४२५·० |

## उत्तर प्रदेशांत अल्युमिनमचा कारखाना

भारतांत ज्या ठिकाणीं विजेचा पुरवठा होऊं शकेल आणि अल्युमिनम तयार करण्यासाठीं लागणारी बॉक्साइट ही माती उपलब्ध असेल त्या ठिकाणीं अल्युमिनमचा कारखाना काढण्याचे प्रयत्न चालू आहेत. महाराष्ट्रांत कोल्हापूर येथें अल्युमिनमचा कारखाना काढण्याचा विचार चालू आहे, त्याचप्रमाणें उत्तर प्रदेशांत रिहंड येथें बांधण्यांत येत असलेल्या धरणाच्या नजीक असाच एक कारखाना काढण्यांत येणार आहे. संकल्पित कारखान्यासंबंधीं मध्यवर्ती सरकार, उत्तर प्रदेश सरकार आणि बिर्ला उद्योगधंद्यांचा गट ह्यांच्या प्रतिनिधींनीं एकत्र जमून नुकत्याच वाटाघाटी केल्या. रिहंड येथें बांधण्यांत यावयाच्या कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता १२,००० टन असणार आहे. जमलेल्या प्रतिनिधींत बराच दीर्घ काल वाटाघाटी झाल्यावर रिहंड धरणापासून मिळणाऱ्या विजेचा फायदा घेऊन खाजगी मालकीचा हा कारखाना काढण्याची परवानगी बिर्ला गटाला देण्यांत आली. बैठकींत कारखान्याची नक्की जागा ठरविणें व वीज पुरवठ्याचा दर, ह्या मुद्यासंबंधीं निर्णय घेण्यांत आल्याचें समजतें. रिहंड येथें होत असलेल्या धरणावर सुमारें दोन वर्षांच्या कालांत २·५ किलोवॅट वीज तयार होऊं लागेल. त्यापैकीं ४० ते ६० हजार किलोवॅट वीज कारखान्याला पुरवावी लागेल. कारखान्याला लागणारी बॉक्साइट ही खनिज माती मध्यभारतामधील कटनी व अमरकंटक ह्या ठिकाणांहून आणण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी लागणारी तांत्रिक मदत अमेरिकेंतील कैसर कंपनीकडून घेण्यांत येईल. सर्व काम सुरळीत पार पडल्यास १९६१ मध्यें उत्पादनास प्रारंभ होईल.

---

## पोलादाच्या कारखान्यांची प्रगति

भारतांत भिलई येथें बांधण्यांत येत असलेल्या कारखान्याची उभारणी रशिअन तंत्रज्ञांकडून करण्यांत येत असून रुरकेला येथें उभारण्यांत येत असलेला कारखाना पश्चिम जर्मनीच्या सहकार्यानें होत आहे. ह्या कारखान्यांतील पहिली भट्टी ३१ डिसेंबर, १९५८ रोजीं चालू करण्याची एक प्रकारची स्पर्धाच उभयता देशांच्या तंत्रज्ञांत लागली आहे. त्यांतल्या त्यांत रुरकेला येथें बांधण्यांत येणारा कारखाना विशेष महत्त्वाचा ठरण्याचा संभव आहे. कारण, हा कारखाना चालू झाल्यावर त्यामधून पोलादाचा विविध प्रकारचा माल बाहेर पडूं लागून परदेशीय चलनाच्या खर्चांत बरीच मोठी बचत होणार आहे. खाजगी मालकीच्या पोलादाच्या कारखान्यांचाहि विस्तार करण्यांत येत आहे. त्यामुळें १९५८ व १९५९ सालीं पोलादाचा अधिक माल विक्रीसाठी तयार होईल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पोलादाच्या उत्पादनाचें उद्दिष्ट १·५ कोटी टन ठेवण्यांत येणार असल्याचें समजतें. हें उद्दिष्ट गांठण्यांत यश मिळालें तर दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमापेक्षा ९० लाख टन पोलाद अधिक उत्पन्न करण्यांत आलें असें होईल. बोकॅरो येथें पोलादाचा चवथा कारखाना काढण्याचें ठरविण्यांत आलें असून त्याच्या प्राथमिक तयारीसाठी चालू आर्थिक वर्षांत ५० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या कारखान्यासाठी लागणाऱ्या परदेशीय मदतीसंबंधीं अद्याप विचार चालू आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागांत भांडवल गुंतविण्यास अमेरिकन भांडवलदार सहसा तयार होत नाहींत. पण बोकॅरो येथील कारखान्याला अमेरिकन भांडवलदारांची मदत मिळण्याचा संभव दिसत आहे.

## सहकारी संस्थांच्या सुरक्षिततेचे कांहीं उपाय

(लेखकः—श्री. सुंदरभाई बुटाला, बी. ए., एलएल. बी., महाड)

भारत स्वतंत्र झाल्यापासून सहकारी संघराज्याचें ध्येय त्यानें आपल्यापुढें ठेविलें आहे व त्या दृष्टीनें अनेक मार्गांनीं भारताची वाटचाल सुरू झाली आहे. सहकारी संस्था काढण्यास उत्तेजन देणें हा त्यांपैकीच एक मार्ग आहे. त्यामुळें अनेक सहकारी संस्था स्थापन होत आहेत. परंतु त्यांचा कारभार असावा तसा समाधानकारक नसल्यामुळें अनेक संस्था डबघाईसहि येत आहेत. करितां सहकारी संस्थांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें मी कांहीं इलाज सुचवूं इच्छितों:—

(१) एकाद्या ठिकाणच्या कार्यकर्त्यांनीं सहकारी संस्था काढण्याचा मनोदय व्यक्त केला म्हणजे सहकारी अधिकाऱ्यांनीं त्वरित जरूर तें मार्गदर्शन करावें, व थोड्या अवधींत संस्था नोंदण्याची व्यवस्था करावी. नोंदणीचा अर्ज गेल्यापासून नोंदणीचा दाखला मिळण्यास फार अवधी लागू नये व नोंदणीचा दाखला मिळविण्यासाठी प्रवासादि कामासाठीं फार खर्च होऊं नये.

(२) सहकारी संस्थांचे जमाखर्च ठेवण्याची सध्यांची पद्धत खेडेगांवांतील कार्यकर्त्यांना न झेपण्यासारखी व न समजण्यासारखी आहे. त्यामुळें जमाखर्चांत जाणून-बुजून केलेली अगर सहजगत्या झालेली लबाडी अगर चूक हुडकून काढणें त्यास कठिण जातें. करितां खेडेगांवांतून चाललेल्या सहकारी संस्थांचे जमाखर्च शुद्ध देशी पद्धतीनें ठेवण्याची प्रथा सुरू करण्यांत यावी. एक कीर्द व एक खातेवही ह्यांत संस्थेचा सर्व जमाखर्च समाविष्ट व्हावा; मग त्यांत विषयवारीनें, नांववारीनें व जिन्नसवारीनें कितीहि तपशील व खातीं असोत.

(३) सहकारी संस्थांच्या व्यवस्थापक अगर संचालक मंडळाच्या निवडणुकीस उभें राहूं इच्छिणाऱ्या उमेदवारांनीं सहकारी शिक्षणवर्गांत शिक्षण घेऊन उत्तीर्ण झाल्याचा दाखला नॉमिनेशन पेपर सोबत देण्याचा नियम असावा (मात्र विद्यापीठाची प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झालेल्यास किंवा व्यवस्थापक अगर संचालक मंडळचा सभासद म्हणून तीन वर्षेपर्यंत काम केल्याचा पूर्वानुभव असलेल्यास त्या नियमाची सूट देण्यास हरकत नाहीं.)

(४) वरील निवडणुकीस उभे राहूं इच्छिणाऱ्या उमेदवारानें १९२५ चा सहकारी कायदा व संबंधित संस्थेचे पोट नियम आपण वाचले असल्याचें प्रतिज्ञापत्रक नॉमिनेशन पेपर सोबत देण्याचा नियम असावा.

(५) सहकारी संस्थांचे मासिक ताळेबंद संबंधित सरकारी अधिकाऱ्यांकडे व बॉम्बे स्टेट कोआपरेटिव्ह बँकेसारख्या कर्ज देणाऱ्या संस्थांकडे जात असतात. तेथें त्यांची तावडतोब कसून छाननी व्हावी व सदर ताळेबंदांवरून दिसून येणाऱ्या वस्तुस्थितीविषयीं तावडतोब मार्गदर्शन व्हावें. व्यवहारांत कांहीं चूक होत असल्यास अगर आर्थिक धोका निर्माण होण्याचा संभव दिसल्यास, तसें ताळेबंद पाठविणाऱ्या संस्थेच्या निदर्शनास ताबडतोब आणावें व प्रसंगीं जाबहि विचारण्यांत यावा. हें सर्व वेळच्या वेळीं होत गेलें तर संस्था भावी अर्थसंकटांतून वाचूं शकेल व पुढेंमागें संस्थेच्या कारभाराची चौकशी कर याचा प्रसंग आल्यास, "चोर सोडून संन्याशास फांशीं" देण्याची पाळी येणार नाहीं.

(६) आपल्या प्रारंभिक अवस्थेंत सहकारी संस्थेनें आपला धंदा फारच जपून करावा. त्वरित नाश पावणाऱ्या वस्तूंचा व्यापार हातीं घेऊं नये व शक्यतों माल आखबंद विकण्याचें धोरण ठेवावें. नाशवंत मालाचा व्यापार व किरकोळीची विक्री ह्यामध्यें स्वार्थी माणसांना आपला स्वार्थ साधण्याची भरपूर संधि मिळू शकते. त्याचप्रमाणें, मालाचा अवास्तव साठा ठेवणें फार धोक्याचें असतें. मालाचे दर उतरले तर फार मोठें नुकसान होण्याचा संभव असतो. एकदां संस्था सुप्रतिष्ठित झाल्यास प्रसंगविशेषीं केलेलें व्यापारी धाडस क्षम्य ठरेल. पण प्रथमच्या कांहीं वर्षांत जपून वागणेंच श्रेयस्कर.

(७) नफ्याचे वाटणीचे वेळीं रिझर्व्ह फंड व इतर फंड जे काढतात त्यांच्या रकमा चालू व्यवहारांत न गुंतवितां निराळ्या काढून ठेवण्याची दक्षता घेण्यांत यावी. सहकारी खात्यानेंहि तसें करण्यास सहकारी संस्थास भाग पाडावें.

(८) खुर्च्या, टेबलें, कपाटें वगैरे सारखें कायम सामान (डेडस्टॉक) अगदीं जरूरीपुरतेंच घेण्यांत यावें. डेडस्टॉकची किंमत व भागभांडवल ह्यांचें कांहीं प्रमाण सहकारी खात्यानें ठरवून देणें आवश्यक आहे. तसेंच, पुरेसा इमारत फंड जमल्याशिवाय संस्थेनें कर्ज काढून इमारत बांधण्यास प्रवृत्त होऊं नये.

(९) सभासदांस कर्ज देणाऱ्या संस्थांनीं कर्जे मंजूर करतांना फार दक्षता घेतली पाहिजे व कर्जे मुदतशील करण्याचीहि तत्परता ठेविली पाहिजे. सभासदाची आर्थिक पत व व्यावहारिक दानत ह्यांचा विचार कसोशीनें व निर्भीडपणें झाला पाहिजे. अशा संस्थांच्यापुढें थकबाकीचा प्रश्न ही एक डोकेंदुखीच होऊन बसली आहे. थकबाकीमुळेंच अनेक अर्बन बँकांची स्थिति धोक्याची होऊन बसली आहे.

अशाच प्रकारचे आणखीहि कांहीं उपाय सहकारी संस्थांच्या सुरक्षिततेसाठीं सुचवितां येतील. सहकाराचें तत्त्व चुकीचें नाहीं पण त्यांचा व्यवहार मात्र कोठें तरी चुकत आहे व त्यामुळेंच सहकारी संस्था व्हाव्यात तशा यशस्वी होत नाहींत असें मला वाटतें.

---

## सामान्य वाचकांसाठी सोप्या भाषेंत कंपनी कायदा

मध्यवर्ती व्यापार व उद्योगखात्याच्या कंपनी कायदा कारभार विभागानें कंपनी कायद्यांतील कांहीं महत्त्वाच्या तरतुदी सोप्या भाषेंत स्पष्ट करणाऱ्या तीन पुस्तिका प्रसिद्ध केल्या आहेत.

सामान्य वाचकांना कंपनी कायद्यांतील तरतुदी माहीत होण्याच्या कामीं मदत व्हावी म्हणून प्रसिद्ध करण्यांत यावयाच्या अशा मालिकेंतील हीं पहिलीं तीन प्रकाशनें असून या प्रकाशनांत कंपनी स्थापण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या आवश्यक गोष्टी, कंपन्यांची नोंद करण्याची पद्धति कंपन्यांच्या बैठकी, इ. चा परामर्ष घेण्यांत आला.

कंपन्यांनीं सादर करावयाचीं कागदपत्रें, दप्तर, कंपनी डायरेक्टरांचीं कामें व कंपनी कायद्यानुसार प्रसिद्ध होणारीं परिपत्रकें या चार विषयांवरील चार पुस्तिका तयार होत आहेत.

उपरोक्त पुस्तिका या खात्याच्या संशोधन आणि आंकडेवारी विभागानें प्रसिद्ध केली असून तीं मॅनेजर, पब्लिकेशन्स, दिल्ली यांजकडे मिळूं शकतील.

## ग्रेटब्रिटनमधील बुक-क्लबांचें कार्य

### वाचकांना चांगलीं पुस्तकें स्वस्त मिळण्याची सोय

ग्रंथमालेच्याद्वारां पुस्तकें प्रसिद्ध करण्याचे बरेच प्रयत्न आपल्याकडे होऊन गेले. ग्रंथमालेच्या वर्गणीदारांना मालेंतील पुस्तकें सवलतीच्या दरानें मिळावींत आणि किमान हुकमी गिऱ्हाइकांमुळें मालेचा व्यवहारहि किफायतशीर व्हावा, अशी योजना असे. परंतु, पुरेशा वर्गणीदारांचा अभाव, वर्गणीच्या वसुलींतील अडचणी आणि त्याचा एक परिणाम म्हणजे मालेंतील ग्रंथप्रकाशनाला होणारी दिरंगाई आणि त्यामुळें पुन: वर्गणीदारांची नाखुषी, अशा दुष्टचक्रामुळें ग्रंथमाला यशस्वी झाल्या नाहींत. मराठी पुस्तकांचा एकूण खपच कमी, हें ह्या परिस्थितीचें मूलभूत, आर्थिक कारण आहे. त्यांतूनच बाकीच्या अडचणी निर्माण होतात, हें उघड आहे.

ग्रेटब्रिटनमध्यें चार प्रमुख बुक-क्लब आज विशिष्ट तत्त्वावर चालूं आहेत. त्यांचीं नांवें:—( १ ) दि रिप्रिंट सोसायटी, ( २ ) दि बुक क्लब, ( ३ ) दि कंपॅनिअन बुक क्लब आणि ( ४ ) दि रीडर्स युनियन, अशीं आहेत. मोठे हे क्लब आणि इतर कित्येक लहान क्लब स्वत: मूळ प्रकाशक नसतात, तर इतर प्रकाशकांचीं पुस्तकें ते आपल्या सभासदांना स्वस्त किंमतीला ( मूळ किंमतीच्या जवळजवळ एक तृतीयांश इतक्या किंमतीला ) उपलब्ध करून देतात. कंपॅनिअन बुक-क्लब हा सर्वांत मोठा असून, त्याचे २ ते ३ लक्ष सभासद आहेत. त्याचे खालोखाल रिप्रिंट सोसायटीचा अनुक्रम येतो. सर्व क्लबांच्या एकूण सभासदांपैकी एक चतुर्थांश सभासद ग्रेटब्रिटनच्या बाहेरचे आहेत.

सभासदांच्या मोठ्या मागणीमुळें उत्पादनखर्च कमी येतो आणि पोस्टानें पुस्तकें पाठविल्यामुळें मध्यस्थांचें कमिशन वाचतें. ३०० पृष्ठांच्या, मध्यम यशस्वी कादंबरीचें उदाहरण घेतलें, तर असें दिसून येईल कीं, मूळ प्रकाशक ३,००० पेक्षा ज्यास्त प्रती काढण्यास धजत नाहीं. त्यांपैकीं १०० प्रती परीक्षणासाठीं धाडल्या जातात व ४०० प्रती न खपल्यामुळें शिल्लक पडतात. १५ शिलिंग विक्रीच्या किंमतींपैकीं ५ शिलिंग पुस्तकविक्रेत्यांना कमिशन द्यावें लागतें, १½ शिलिंग लेखकाला मोबदला म्हणून जातो, उत्पादनाला ८½ शिलिंग खर्च येतो. ह्याउलट, बुक-क्लबाला मोठ्या खपामुळें उत्पादनखर्च फक्त २ शिलिंग, १० पेन्स येतो. व्यवस्थाखर्च, मूळ प्रकाशकाचा व लेखकाचा मोबदला, कांहीं प्रतींवर द्यावें लागणारें कमिशन, ह्या सर्वांचा हिशेब केला, म्हणजे क्लब-सभासदांना ५½ शिलिंगाला पुस्तक मिळूं शकतें; टपालखर्च वेगळा.

#### पुस्तकांच्या उत्पादनखर्चाची तुलना

| | प्रकाशक | | बुक-क्लब | |
|---|---|---|---|---|
| | शि. | पेन्स | शि. | पेन्स |
| पुस्तक विक्रेता कमिशन | ५ | ० | १ | ० |
| छपाई | ४ | ६ | १ | ० |
| बाइंडिंग कव्हर | २ | ७ | १ | १० |
| मोबदला | १ | ६ | ० | ४ |
| जाहिरात | १ | २ | ० | ६ |
| व्यवस्थाखर्च | ६ | २ | ० | १ |
| पॅकिंग, पोस्टेज | —— | | १ | १ |
| ठोक नफा | ० | १ | ० | २ |
| एकूण | १५ | ० | ६ | ० |

३०० पृष्ठांची कादंबरी प्रकाशकानें प्रसिद्ध केली; ३,००० प्रती छापल्या; त्यांपैकी २,५०० खपल्या; बुक-क्लबाच्या १,७५,००० सभासदांनीं पुस्तक घेतलें, ह्या हिशेबानें वरील तक्ता तुलनात्मक परिस्थिति दर्शवितो.

प्रत्येक क्लब सुधारणतः दरमहा एक पुस्तक विक्रीसाठी काढतात. क्लबाच्या सभासदांनीं वर्षांत किमान सहा पुस्तकें घेतलीं पाहिजेत. मूळ प्रकाशकानें पुस्तक प्रसिद्ध केल्यानंतर बारा महिन्यांचे आंत बुक-क्लबांना तें पुस्तक प्रसिद्ध करतां येत नाहीं. क्लबांच्या सभासदांना पुस्तकविक्रेतेहि पुस्तकें विकूं शकतात, पण त्यामुळें त्या प्रतींवर बुक-क्लबांना ३३⅓ कमिशन पडतें. तें टाळण्याला मूळ प्रकाशकहि मदत करतात; कित्येक प्रकाशन संस्थांचा बुक-क्लबांशीं आर्थिक हितसंबंध असतो. बुक-क्लबानें एकाद्या पुस्तकाची निवड केली, म्हणजे त्याच्या मूळ आवृत्तीचाहि खप वाढतो आणि त्याच्या पुढील पुस्तकांस तर चांगलीच मदत होते.

बुक-क्लबाचे सभासद एकसारखे बदलत असतात. जुने सभासदत्व सोडीत असतात, नवे दाखल होत असतात. प्रत्येक सभासद सरासरीनें दोन वर्षें सभासद रहातो. नवे सभासद मिळविण्यासाठी प्रचार व जाहिरात ह्यावर खर्च करावा लागतो. प्रत्येक नव्या सभासदामागें हा खर्च सरासरीनें १ पौंड, १४ शिलिंग, इतका येतो ! पुस्तकांच्या वाढत्या किंमती, टेलिव्हिजन, ह्यांचा परिणाम होणें अपरिहार्य आहे. प्रत्येक महिन्याला एक नवें चांगलें पुस्तक वाचून होत नाहीं; तें वाचून होण्यापूर्वीच नवें पुस्तक घरीं येऊन पडतें. तेव्हां, बुक-क्लबाचा सभासद आपलें सभासदत्वच रद्द करून टाकतो ! दर महिन्याऐवजीं दर दोन महिन्यांनीं पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा प्रयोग एक बुक-क्लब आतां करून पहाणार आहे.

---

**सिमेंटच्या धंद्यासाठी वेतन-मंडळ**—भारत सरकारनें सिमेंटच्या कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांचें वेतन ठरविण्यासाठी त्रिपक्षीय वेतनमंडळ नेमलें आहे. कामगारांचें वाजवी वेतन ठरविणें आणि बोनस देण्यासंबंधींचीं तत्त्वें ठरविणें हीं कामें मंडळाला करावीं लागतील. मंडळावर कामगार व मालक ह्यांचे प्रतिनिधी आणि लोकसभेंतील दोन स्वतंत्र सभासद नेमण्यांत आले आहेत.

**दारूबंदीच्या कार्याला मदत**—मुंबई राज्यांतील दारूबंदीच्या कामांत अधिक कार्यक्षमता यावी म्हणून गांधी स्मारक निधीनें ५ लाखांची रकम मुंबई सरकारला दिली आहे. ही रकम पांच वर्षांत देण्यांत येईल. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीनें दारूबंदी अधिक परिणामकारक करण्यासाठी रकमेचा विनियोग करण्यांत येईल.

**दंत-वैद्यकाची फिरती मोटार**—मद्रास येथील जनरल हॉस्पिटलसाठी चेक सरकारनें दंतवैद्यकाची एक फिरती मोटार दिली होती. परंतु मोटारीच्या एंजिनांत कांहीं बिघाड झाल्यानें तिचा उपयोग गेले चार महिने करतां येत नाहीं. मोटारीची किंमत २,३०,००० रुपये आहे.

**रावीचें पात्र बदलल्याचा परिणाम**—भारत स्वतंत्र झाल्यापासून गेल्या वर्षाअखेरपर्यंत १०,२०६ एकर जमीन पाकिस्तानच्या हद्दींत गेली आहे. रावी नदीचें पात्र बदलल्यामुळें हा प्रकार झाला असून अमृतसर जिल्ह्यांतील ४४ खेडीं त्यामुळें भारतामधून गेलीं आहेत.

### भारतामधील दुधाचें उत्पादन व खप

१९५६ सालीं भारतामधील दुभत्या जनावरांची शिरगणती करण्यांत आली. त्यावरून भारतामधील दुधाचें उत्पादन व खप ह्याबाबत पुढीलप्रमाणें माहिती मिळते. १९५६ सालीं देशांत ४७·७७ कोटी मण दुधाचें उत्पादन करण्यांत आलें. त्यापैकी २५·४ कोटी मण दूध म्हशींचें, २०·७ कोटी मण गाईचें आणि १·६५ कोटी मण शेळीचें होतें. दुधाच्या एकूण उत्पादनापैकी ३९·२ टक्के दूध दुधाच्या स्वरूपांत वापरण्यांत आलें. सगळ्यांत जास्त म्हणजे ४० टक्के दुधाचा उपयोग तूप तयार करण्यासाठी झाला. दह्यासाठी ८·८ टक्के, लोण्यासाठी ६·१ टक्के, खव्यासाठी ४·३ टक्के आणि आइसक्रीमसाठी ०·५ टक्के दुधाचा उपयोग करण्यांत आला. उत्तर प्रदेशांत सर्वांत अधिक म्हणजे १२·२ कोटी मण दूध निर्माण करण्यांत आलें. त्याच्या खालोखाल पंजाबमध्यें ६·१ कोटी मण दूध निर्माण करण्यांत आलें. मुंबई, बिहार, आंध्र व राजस्थान ह्या राज्यांतून सुमारें ४ ते ५ कोटी मण दुधाचें उत्पादन होतें. अखिल भारतांत दरमाणशीं दररोज दुधाच्या खपाचें प्रमाण ४·७६ औंसच आहे. स्वीडन व स्वित्झरलंडमध्यें हें प्रमाण २२·८ औंस आहे. अमेरिकेंत हें प्रमाण १७ औंस आहे व डेनमार्कमध्यें १५·८ औंस आहे. उत्तर प्रदेश, पंजाब व मुंबई ह्या राज्यांतून आइसक्रीमचें उत्पादन अधिक होतें. पंजाबमध्यें लोण्याचा खप अधिक आहे. मद्रास, काश्मीर, बिहार व आंध्र राज्यांतील लोकांना दहीं अधिक आवडतें. उत्तर प्रदेश व आसाम ह्या राज्यांत खवा अधिक प्रिय आहे.

---

### भारत-पोलंड व्यापारी कराराच्या मुदतींत एका वर्षानें वाढ

भारत-पोलंड व्यापारी कराराची मुदत आणखी एक वर्षानें म्हणजे ३१ डिसेंबर, १९५८ अखेरपर्यंत कोणताहि फेरबदल न करतां वाढविण्यांत आली आहे. हा व्यापारी करार ३ एप्रिल १९५६ रोजीं करण्यांत आला होता व तेव्हांपासून या दोन देशांमधील व्यापारांत उत्तरोत्तर वाढच होत आहे. १९५८ च्या पहिल्या सात महिन्यांत भारतांतून पोलंडकडे १०५ लक्ष रुपये किंमतीचा माल निर्यात झाला, तर ४३४ लक्ष रुपये किंमतीचा माल तिकडून आयात करण्यांत आला.

---

### मुंबई राज्यांतील घरबांधणी योजना

घरबांधणीच्या निरनिराळ्या योजनांखालीं मिळून १९५६–५७ मध्यें मुंबई राज्यासाठीं ३९२·०३ लक्ष रु. रक्कम मंजूर करण्यांत आली होती. या रकमेपैकी कर्ज व आर्थिक साह्य या रूपानें राज्य सरकारनें १८१·३४ लक्ष रु. रक्कम प्रत्यक्षपणें वापरली.

---

**डमडम येथील विमानतळ**—कलकत्त्याजवळील डमडम विमानतळ आशिआंतील सर्वांत गर्दीचा म्हणून प्रसिद्ध आहे. पण, ह्या विमानतळावर जेटवर चालणारीं विमानें उतरविण्याच्या घसरपट्ट्या नाहींत. तशी सोय करण्यांत आली नाहीं तर विमानतळाचें महत्त्व कमी होईल. कारण, १९५९–६० च्या सुमारास बहुतेक विमान कंपन्या अशीं विमानें वापरूं लागतील.

**भारतीय नृत्यपटूंचा कार्यक्रम**—जपानमधील प्रमुख शहरीं भारतीय नृत्यांचे कार्यक्रम करण्यासाठी कलावंतांची एक तुकडी तिकडे गेली आहे. कलावंतांचा पहिला कार्यक्रम टोकिओमध्यें झाला. कार्यक्रमासाठी राजघराण्यांतील मंडळी उपस्थित राहिली होती.

### भारत-इजिप्त यांमधील व्यवहाराची पैशाची व्यवस्था

भारत सरकारचे अधिकारी आणि इजिप्शियन व्यापार प्रतिनिधी मंडळानें उभय देशांपुढील परकीय हुंडणावळींतील अडचणी व इजिप्शियन सरकारनें प्रसृत केलेल्या परकीय हुंडणावळीसंबंधींच्या अलीकडील नियमानुसार व्यापार व व्यापारविषयक देण्याघेण्याच्या समान बाबी, ह्यांचें पुनर्विलोकन केलें. तदनुसार असें ठरविण्यांत आलें आहे कीं, इजिप्तमध्यें परकीय हुंडणावळीवरील सध्यांचीं नियमनें चालू असेपर्यंत भारतांतून चहा व तागी माल यांची आयात करण्याचें व भारतांत कापसाची निर्यात करण्याचें करार, इजिप्शियन पौंडांत करावेत. चहा व तागी मालाच्या भारतीय निर्यातदारांस व इजिप्शियन कापसाच्या भारतीय आयातदारांस बँकिंगच्या सोयी करून देण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया ही नॅशनल बँक ऑफ इजिप्तमध्यें इजिप्शियन पौंडांत एक खातें उघडील. चहा व तागी माल व कापूस यांव्यतिरिक्त मालाच्या आयात-निर्यातीसाठी पैशाचे व्यवहार भारतीय रुपयांत होतील.

---

### कराचींतील नागरिकांना लष्करी संरक्षणाची आवश्यकता

पाकिस्तानच्या फेडरेशन ऑफ चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या विद्यमानें व्यापारी व उद्योगपती ह्यांची एक सभा भरली होती. त्या सभेनें ठराव करून, कराचीमध्यें निदान तीन महिने तरी लष्कर आणून ठेवावें, म्हणजे शांतता व सुरक्षितता प्रस्थापित होईल, अशी सरकारला विनंती केली आहे. कराचीमध्यें गुन्ह्यांचें प्रमाण वाढत आहे आणि त्यामुळें जीवित, मालमत्ता आणि अब्रू ह्यांस धोका प्राप्त झाला आहे. ह्या प्रश्नाकडे तातडीनें लक्ष पुरविण्यांत आलें नाहीं, तर लोकांतील घबराट वाढेल आणि शहरांतील अस्थिर वातावरणाचे दुष्परिणाम सबंध देशाच्या आर्थिक जीवनावर होतील, असें ठरावांत म्हटलें आहे.

---

### भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ

भारताचें राष्ट्रीय उत्पन्न, चालू किंमतीच्या आकड्यांत, १९५६–५७ मध्यें ११,४१० कोटि रु. झालें. १९५५–५६ मध्यें तें ९,९९० कोटि रु. होतें. १९५४–५५ च्या मानानें १९५५–५६ मध्यें ३८० कोटि रु. ची व १९५६–५७ मध्यें १,८०० कोटि रु. ची वाढ झाली.

१९५४–५५ मध्यें दरमाणशीं वार्षिक उत्पन्न २५४·२ रु. होतें, तें १९५५–५६ मध्यें २६०·८ रु. व १९५६–५७ मध्यें २९४·३ रु. झालें. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत राष्ट्रीय उत्पन्नांत १८·४% वाढ अनुभवास आली; १९५६–५७ मधील वाढ ५·१% आहे. दरमाणशीं उत्पन्नांतील वाढीचें प्रमाण अनुक्रमें ११·१% व ३·८% होतें.

---

### पुस्तक-प्रकाशनांत भारत अग्रेसर

भारतांतील ८०% लोक निरक्षर आहेत. तरीसुद्धां, प्रकाशित पुस्तकांच्या संख्येच्या बाबतींत भारताचा अनुक्रम चौथा आहे. अमेरिका, फ्रान्स, इटली, इत्यादि देशांचा अनुक्रम भारताच्या खालीं लागतो. युनायटेड नेशन्सच्या १९५७ च्या इअर बुकांत ही माहिती दिलेली आहे.

## आफ्रिका खंडांतील ख्रिस्त्यांचें भवितव्य

आफ्रिका खंडांतील बहुसंख्य जनतेला ख्रिस्ती बनविण्याचे प्रयत्न गेले दीड हजार वर्षें चालू आहेत. त्यांपैकी सध्यां चालू असलेल्या धर्मांतराच्या चळवळीचें स्वरूप थोडक्यांत पुढीलप्रमाणें सांगतां येईल.

### डेव्हिड लिव्हिंग्स्टन

या संबंधांत डेव्हिड लिव्हिंग्स्टनचें कार्य फार महत्त्वाचें मानावें लागेल. सुमारें शंभर वर्षांपूर्वी केंब्रिज येथें विद्वानांसमोर त्यानें पुढील विचार मांडले होते. "मी आफ्रिकेंत जें काम सुरू केलें आहे, त्यांतून युरोपियन संस्कृति व व्यापार यासाठी एक नवीन कार्यक्षेत्र मोकळें होईल. माझ्या पश्चांतहि हें कार्य आपण चालवाल अशी आशा आहे." या भाषणाचा तेथील विद्वानांवर फारच परिणाम झाला.

त्यामुळेंच इ. स. १८५७ पासून विश्वविद्यालयीन मिशनरी पूर्व व मध्य आफ्रिकेमध्यें धर्मप्रसाराचें काम करूं लागले. सहाराच्या दक्षिणेस मिशनऱ्यांच्या कार्याचा प्रसार फार झाला आहे. त्यांचें कार्य त्या भूमींत फार खोलपर्यंत रुजलें आहे.

### मिशनऱ्यांचें उल्लेखनीय कार्य

आफ्रिकेंतील नायगेरिया, युगांडा व न्यासालँड येथें ख्रिस्ती चर्चेस म्हणजे, तेथील जमातींचें एक मानाचें स्थान झालें आहे. विशेष म्हणजे त्यांत परंपरागत चालत आलेल्या आफ्रिकेंतील संस्कृतीचे अवशेष कायम आहेत.

खंडांतील सर्व प्रगतींत व सुधारणांचे कार्यांत तेथील देशी लोकांना अग्रस्थान मिळालें पाहिजे, अशी मागणी तेथील ख्रिस्ती चर्चेस विशेषत्वानें करीत आहेत.

सध्यां ख्रिस्ती मिशनऱ्यांना जी अडचण वाटते ती मुख्यत्त्वें योग्य माणसांच्या संबंधांत आहे. धर्मप्रसाराकरितां बिशप व पाद्री याकरितां कर्तबगार माणसें कुठून मिळवावयाची ? स्थानिक लोकांत अशीं हुशार माणसें फार प्रमाणांत आढळत नाहींत.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं तेथें सगळ्यांत मोठी कामगिरी शिक्षण-क्षेत्रांत केली. ती निश्चितच वाखाणण्याजोगी आहे. त्यामुळेंच खंडांतील बहुतेक सर्व ब्रिटिश वसाहतींतून शिक्षणाचा प्रसार झाला असून विद्येसंबंधीं तेथील लोकांत आस्था वाढूं लागली आहे.

### मिशनरी व इस्लामचा प्रसार

या खंडांत ख्रिस्ती संस्कृतीचा प्रसार किती दूरपर्यंत झाला आहे हें पहाण्याजोगें आहे. शहरी जीवनांत त्याचा पदोपदीं अनुभव येतो. तरी देखील इस्लाम धर्माचा पगडा कांहीं कमी होतांना दिसत नाहीं. बहुजन समाजाला इस्लामधर्म आपलासा वाटतो. फक्त याच धर्मांत खरी समानतेची व बंधुत्वाची वागणूक मिळते असा सामान्य लोकांचा अनुभव आहे.

विशेष म्हणजे हा इस्लामचा प्रसार हिंसेचा अवलंब न करतां चालू आहे. त्याच्या प्रसाराचें काम इतकें वेगानें व व्यापक होत आहे कीं त्याच्याशीं टक्कर देणें हा ख्रिस्ती मिशनऱ्यांसमोर एक महाभयंकर प्रश्न येऊन ठेपला आहे. याशिवाय आफ्रिकेंत जीं विविध तऱ्हेचीं सांस्कृतिक स्थित्यंतरें होत आहेत त्यांचाहि विचार ख्रिस्ती मिशनरी करीत आहेत.

## महाराष्ट्र विभागीय सहकारी परिषद, अहमदनगर

अहमदनगर येथें, महाराष्ट्र डिव्हिजनल को-ऑपरेटिव्ह बोर्ड, पुणें या संस्थेच्या विद्यमानें महाराष्ट्र विभागीय सहकारी परिषद रविवार दिनांक २७ व सोमवार दिनांक २८ एप्रिल १९५८ रोजीं भरविण्याचें निश्चित झालें आहे. परिषदेचें उद्घाटन नामदार डॉ. पंजाबराव देशमुख, सहकार मंत्री, भारत सरकार हे करणार आहेत व परिषदेचें अध्यक्षस्थान श्री. भाऊसाहेब हिरे एम. एल. ए., माजी महसूलमंत्री, मुंबई राज्य हे स्वीकारणार आहेत. त्याप्रमाणें, परिषदेच्या पूर्वतयारीस जोरानें सुरवातहि झाली आहे. परिषदेच्या कामासाठी आर्थिक मदतीची जरूरी असून या मदतीची पूर्तता आपले सहकार्यानेंच होणार आहे.

परिषदेची वर्गणी खालीलप्रमाणें आहे.

| संस्थेचें नांव | रक्कम रु. |
|---|---|
| (१) जिल्हा सहकारी बोर्डस ... | २०-०० |
| (२) जिल्हा मध्यवर्ती बँका व जिल्हा खरेदी-विक्री संघ ... ... ... | १००-०० |
| (३) जिल्हा भूतारण बँका, ता. मध्यवर्ती बँका, अर्बन बँका, ता. ख. वि. संघ, ग्राहक, औद्योगिक, व हौसिंग सोसायट्यांचे संघ व ॲग्रि. मार्केट कमिट्या | २५-०० |
| (४) पाणीपुरवठा व सहकारी शेती, ग्राहक, हौसिंग, मोठ्या वि. का. सोसायट्या व व्यक्ति ... | १०-०० |
| (५) तालुका सुपरवायझिंग युनियन व को-ऑप. क्रे. सोसायट्या ... ... ... | ५-०० |
| (६) सहकारी साखरकारखाने ... | २५०-०० |

सदर परिषदेस वरील संस्थांना एक एक प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क असेल. तरी कार्याचे महत्त्व जाणून सर्व संस्थांनीं व व्यक्तींनीं या परिषदेच्या कामकाजास आर्थिक सहकार्य करून आपली वर्गणी शक्य तितक्या लवकर खालील पत्त्यावर पाठवावी व परिषद यशस्वी करण्यास मदत करावी. कळावे.

टीप :—वर्गणी व ठराव पाठविण्याचा पत्ता—

महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद, अहमदनगर जिल्हा सहकारी बोर्ड, ५११८३ माळीवाडा, म्युनिसिपल रोड, अहमदनगर, जि. अहमदनगर.

आपले सहकारी,

सही :-दौ. ज. झुंझारराव, ऑ. सेक्रेटरी, सही :-दे. मा. निकम, चेअरमन,

महाराष्ट्र डिव्हिजनल को-ऑपरेटिव्ह बोर्ड लि., पुणें, १.

---

## उत्तम प्रतीचें मीठ तयार करण्याची नवी पद्धति

जेवतांना वापरण्यांत येणारें उत्तम प्रतीचें मीठ तयार करण्याची एक नवी पद्धति भावनगर येथील मध्यवर्ति मीठ संशोधन संस्थेनें शोधून काढली आहे. या पद्धतीमुळें तलावांतून तसेंच समुद्राच्या पाण्यापासून मिळणारें मीठ ९९ किंवा अधिक टक्के शुद्ध स्वरूपांत तयार करतां येतें. या पद्धतीचा व्यापारी प्रमाणावर उपयोग करूं इच्छिणाऱ्यांनीं सेक्रेटरी, नॅशनल रीसर्च डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, मंडी हाऊस, लिटन रोड, नवी दिल्ली-१ ह्या पत्त्यावर लिहावें.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.